भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ४५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०६/२०१७

**१) एसटी बसने कान्द्री वरुन भंडारा येथे येण्यास निघाली असता गळयातील मंगळसुत्राची चोरी करुन चोरुन नेल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक १९/०६/२०१७ चे १७.०० वा. दर. यातील फिर्यादी श्रीमती मयुरकुमार वाडीभस्मे वय ३१ वर्ष, रा. बालाजी नगर खात रोड भंडारा ही वरठी रेल्वे स्टेशन येथुन कान्द्री ते भंडारा बसने भंडारा येथे जाण्यास निघाली असता तिचे लक्षात आले की तिच्या गळयातील १ सोन्याचा मंगळसुत्र २५ ग्रॅम किंमती ५०,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**२) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे बाभळीच्या झाडाला धडक देवुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक १९/०६/२०१७ चे १०.३० ते ११.०० वा. दर. यातील आरोपी मृतक हा आपले ताब्यातील यामाहा कंपनीची मोटार सायकल क्रमांक एमएच ३६ पी जे ९६४८ ही भरधाव वेगाने, हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन करांडला ते डोकेसरांडी रोडवरील वळणाचे बाजुला असलेल्या बाभळीच्या झाडाला स्वतःहा धडक मारुन गंभिर जखमी होवुन स्वतःचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी चंद्रशेखर टेंभुरकर वय ३५ वर्ष, रा. सरांडी खुर्द यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३०४(अ) भांदवि. १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निबेंकर पो.स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**३) संगनमत करुन शेतातील येण्या जाण्याच्या रस्त्याच्या कारणावरुन झगडा, भांडण व शिवीगाळ करुन हाताबुक्यांनी मारुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक १९/०६/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी पंढरी सोमाजी तांबुळकर वय ६५ वर्ष, रा. खैरी दिवान हे आरोपीचे शेतातुन आपले बैलबंडीच्या येण्या–जाण्याचे रस्त्याने आपले शेत बांधीत पाईप लावुन पऱ्याला पाणी देत असता आरोपीने फिर्यादीस तुझा येथुन रस्ता नाही तु पाणी न्यायाचा नाही असे म्हणुन त्याचे सोबत पाईप नेण्याचे कारणावरुन दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन झगडा, भांडण शिवीगाळ करुन फिर्यादीस आरोपी क्र. १ ने हाताबुक्यांनी डावे गालावर, कपाडावर मारुन जखमी करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३२४,५०४,५०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. चुटे पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल चालकांच्या निष्काळीपणामुळे वाहन चालवुन धडक देवुन वाहनाचे नुकसान केल्याने गुन्हा नोंद .:–**

दिनांक १९/०६/२०१७ चे १०.०० वा. दर. यातील फिर्यादी रवीशंकर रामदेवराव बावनकर वय ५६ वर्ष, रा. हा आपले वाहन क्र. एनएच ३६ एच ८६२५ विटारा ब्लेझा नी परीवारासह जात असता यातील आरोपी मोटार सायकल चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे वाहनाचे उजव्या बाजुला धडक मारुन वाहनाचे उजव्या बाजुचे मिरर, दोन्ही दारांना धडक मारुन अंदाजे ५०,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,४२७ भांदवि. आरडब्लु १३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सतदेवे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**५) अवैध देशी दारु/ जुगार अडयावर धाडी . :–**

दिनांक १९/०६/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे भंडारा, सिहोरा व गोबरवाही येथे अवैध देशी दारु/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपींच्या ताब्यातुन २९ लिटर हातभट्टी दारु, किंमती २०५०/–रु, तसेच जुगारातुन किंमती ८१२ /–रु. असा एकुण किंमती २,८६२/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

20.6.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.